दैनिक सकाळ- 11 नोव्हेंबर, 2022

# विद्यार्थी घेताहेत सायबर सुरक्षा जागृतीचे धडे

## 'उमवि'त सातत्यपूर्ण मोहीम

**सकाळ वृत्तसेवा**

जळगाव, ता. १० : सध्या सायबर क्राईमचे प्रमाण वाढले असल्याच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थी व विद्यार्थिनींमधील सजगता वाढावी, यासाठी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या संगणकशास्त्र प्रशाळेच्या विद्यार्थ्यांकडून विद्यापीठातील विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेबाबत जनजागृती करण्यात आली.

विद्यापीठाच्या संगणकशास्त्र प्रशाळा आणि क्विक हिल फाउंडेशन यांच्यात झालेल्या सामंजस्य करारांतर्गत सायबर सुरक्षेबाबत जनजागृतीचे कार्यक्रम घेण्यात येत आहेत. ९ नोव्हेंबरला एमबीएच्या विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेबद्दल माहिती देण्यात आली. संगणकशास्त्र प्रशाळेचे विद्यार्थी स्वयंसेवक जय पंडित व भावेश थोरात यांनी विद्यार्थ्यांना माहिती दिली.

संगणक शास्त्रप्रशाळेतील विद्यार्थी स्वयंसेवक धनराज बोंडे व मानसी बोरोले यांनी सायबर सुरक्षेबद्दल संगणकशास्त्र प्रशाळेतील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या दोन्ही सेशनमध्ये त्यांनी २७० विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या दोन्ही कार्यक्रमांना संगणकशास्त्र विभागप्रमुख प्रा. मनीष जोशी, समन्वयक प्रा. राजू आमले, प्रा. सुरेंद्र कापसे व क्विक हिल फाउंडेशन यांच्यातर्फे महेश भर्डी आदी उपस्थित होते.



जळगाव : विद्यापीठात झालेल्या उपक्रमात सायबर सुरक्षेबाबत विद्यार्थ्यांशी संवाद साधताना विद्यार्थिनी.